लोकसत्ता पु.पा.४

# पोलीस परवानगीशिवाय भाडोत्री

## तुळिंजमध्ये २५ घरमालकांवर गुन्हे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** परदेशी नागरिकांना पोलिसांच्या परवानगीशिवाय परस्पर घरे भाड्याने देणाऱ्यांविरोधात पोलिसांनी पुन्हा कारवाई सुरू केली आहे. नालासोपारामधील तुळिंज पोलिसांनी अशा प्रकरणांत २५ घरमालकांविरोधात गुन्हे दाखल करून अटक केली आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्यात ११ घरमालकांविरोधात अशा प्रकारची कारवाई करण्यात आली होती.

वसई-विरार शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिकीकरण होत आहे. विविध राज्यांतील तसेच परदेशी नागरिक देखील विविध कारणांसाठी शहरात वास्तव्यासाठी येत आहेत. परदेशी नागरिकांमध्ये नायजेरियन, बांग्लादेशी आणि इतर आफ्रिकन देशांतील नागरिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अनेक




गुन्ह्यांच्या प्रकरणात परदेशी नागरिकांचा सहभाग आढळून आला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ते देशात प्रवेश करून वास्तव्य करत असल्याचेही अनेकदा दिसून आले आहे.

त्यामुळे घरे भाड्याने देताना पोलिसांचा 'ना हरकत दाखला' घेणे बंधनकारक करण्यात आले होते. याशिवाय परदेशी नागरिकांना घरे देताना 'सी' फॉर्म भरून पोलिसांचा ना हरकत दाखला घ्यावा लागत होता. मात्र अनेक परदेशी नागरिक पोलिसांच्या अशा

> पोलिसांना माहिती न देता परदेशी नागरिकांना घरे देणाऱ्या घरमालकांविरोधात आम्ही कारवाई सुरू केलेली आहे. यातील बहुतांश परदेशी नागरिक हे नायजेरियन आहेत.
>
> - मधुकर पांडे, पोलीस आयुक्त

दाखल्यांशिवाय राहात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे अशा परदेशी नागरिकांना घरे देणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

तुळिंज पोलिसांनी अशा प्रकरणात एकूण २५ घरमालकांविरोधात कारवाई केली आहे. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये कोणत्याही परदेशी नागरिकांना घर भाड्याने देताना २४ तासांच्या आत पोलिसांना कळवणे बंधनकारक असते. त्यामुळे अशी माहिती दडवून ठेवणाऱ्यांना भारतीय दंडविधान संहितेच्या कलम १८८, रिपोर्ट टू पोलीस ऑर्डर १९७१ च्या नियम २ अन्वये, तसेच विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ च्या कलम १४ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे.

मार्च महिन्यात देखील तुळिंज पोलिसांनी अशाप्रकारे परदेशी नागरिकांना घरे देणाऱ्या ११ जणांवर गुन्हे दाखल केले होते. त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल केल्याने त्यांना शिक्षा आणि दंड होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सध्या शहरात मनाई आदेश लागू केले आहेत. त्यानुसार घरात भाडेतत्त्वावर, तसेच हॉटेल, लॉजेस, क्लब, गेस्ट हाऊस इत्यादी ठिकाणी परदेशी नागरिक आल्यास त्यांची माहिती विहित प्रपत्रामध्ये २४ तासांच्या आत पोलिसांना देणे बंधनकारक आहे.

लोकसत्ता पु.पा.७.

# १७ गावपाड्यांचा मतदानावर बहिष्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार परिसरातील आदिवासी गावपाड्यातील नागरी समस्येकडे शासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. याशिवाय या भागात उभ्या राहत असलेल्या अनधिकृत बांधकामे व कारखानांमुळे या भागातील आदिवासींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीतील मतदानावर १७ गावपाड्यांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

पेल्हार भागात पेल्हार गाव आणि डोंगरपाडा, वंगणपाडा, वर्तक वसाहत, जाबरपाडा, धांगडपाडा, सागपाडा, भिड्याचापाडा, रानशेतपाडा, मनीचापाडा, शिवेचापाडा गडगापाडा, कण्याचा पाडा, वाकणपाडा, डोंगरीपाडा, वनोठापाडा, बागपाडा असे १७ गावपाडे आहेत. या भागात तीन ते साडेतीन हजार नागरिक राहत आहेत. आदिवासी समाजाच्या युवक-युवती आणि सामाजिक संघटनांनी एकत्रितपणे मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. तसे पत्रही मुख्य निवडणूक आयोगाला दिले आहे.

लोकसत्ता पु. पा. १.

# पावसाळी समस्या एक महिन्यात सोडवा

## महामार्ग प्राधिकरण, रेल्वे, वनविभाग, पोलिसांना महापालिकेचे निर्देश

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पावसाळ्याती शहरातील जलसंकट दूर करण्यासाठी पालिकेने महामार्ग प्राधिकरण, रेल्वे, वनखाते. महावितरण, वाहतूक पोलीस आदी प्रमुख विभागांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत जलसंकट दूर करणे तसेच भूस्खलन, दरड कोसळणे आदी संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी कामांचे निर्देश दिले आहे. येत्या एक महिन्यात ही सर्व कामे पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे.

पावसाळ्यात शहर जलमय होण्याबरोबरच भूस्खलन होणे, सखल भागात पाणी साचणे, वीजेचा धक्का लागणे, दरड कोसळणे, वाहतूक व्यवस्था ठप्प होणे, महामार्गावर पाणी साचणे आदी विविध समस्या निर्माण होत असतात. पालिकेचा आपत्कालीन विभाग या काळात सज्ज असतो तसेच पालिका विविध उपाययोजना करत असते. मात्र, यंदा ही समस्या दूर करण्यासाठी पालिकेने सर्व महत्वाच्या विभागांसमवेत समन्वय साधून उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. यंदा या कामांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली महावितरण, महामार्ग प्राधिकरण, वनविडाग, रेल्वे, वाहतूक पोलीस आणि डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन (डीएफसीसीएल) आदी विभागाबरोबर संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयुक्तांनी विविध विभागांना कामांचे निर्देश दिले आहेत.



### महामार्गावरील जलसंकट रोखण्यासाठी उपाय

महामार्गावरील पाणी साचून वाहतूक ठप्प होत असते. यासाठी महामार्गालगत असलेला राडारोडा साफ करणे, वासमारे पुलाजवळ (रेल्वे क्रॉसिंग)असलेल्या दुभाजकामधील दगड, माती साफ करण्याचे निर्देश दिले आहेत. सनशाईन हॉटेल, रेल्वे क्रॉसिंग, न्यू फाऊंटन सिटी आदी १४ प्रमुख ठिकाणी नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करणे, नैसर्गिक नाले साफ करणे, पाणी जाण्याचे मार्ग तयार करणे आदी कामांचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय महामार्गावर डि वॉटर पंपिगची व्यवस्था करणे, पाणी जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग (ड्रेन लाईन) तयार करणे, पेट्रोलिंग वाहने, रुग्णावाहिका आणि क्रेन तयार ठेवावी तसेच २४ तास कार्यरत राहणारा आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष तयार करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

### सूचना काय?

- रेल्वे आणि वनविभागाने त्यांच्या अखत्यारित असलेल्या नाल्यांची साफसफाई करणे, भूस्खलन होण्याची ठिकाणी शोधून तेथील रहिवाशांचे सुरक्षित स्थळी स्थलांतकर करावे आणि अशा ठिकाणी अतिक्रमणे झाली असतील ते निष्काषित करावी.
- महावितरणाच्या अनेक ठिकाणी वीजवाहक तारा या धोकादायक अवस्थेत आहेत. या तारा बदलणे, भूमीगत वीजवाहक तारा उघड्या असतील तर त्या संरक्षित करणे, उघडे विद्युत मीटर (डीपी बॉक्स) बंदीस्त करणे.
- डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशनतर्फे शहरात अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत. त्यामुळे पाणी साचून दुर्घटना होऊ शकतात. त्यामुळे डीएफसीसीएने कामे सुरू असलेल्या ठिकाणी योग्य त्या उपाययोजना कराव्यात.
- डीएफसीसीएलने भराव काढण्याचे काम केले नाहीतर आपत्ती व्यव्यस्थापन कायद्याअंतर्गत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे, असे कडक निर्देशही आयुक्तांनी यावेळी दिले.

CamScanner

पुण्यनगरी पृ.पा.१.

# वसईत बेकायदा बांधकामे तोडून भूमाफियांना दणका

## उपायुक्त मुठे यांची धडक कारवाई वसई-विरारमधील भूमाफियांना हादरा



। नालासोपारा : अनधिकृत बांधकामाचे कर्दनकाळ म्हणून ओळखले जाणारे उपायुक्त अजित मुठे यांना पुन्हा अनधिकृत बांधकामाचा पदभार मिळताच त्यांनी धडक कारवाई सुरू केली आहे. मुठे यांनी सुरुवातीलाच वसई पूर्वेच्या वाघरळपाडा येथील अनधिकृत बांधकामे तोडून येथील भूमाफियांना चांगलाच दणका दिला आहे. अजित मुठे हे कुणाच्याही दबाबाला न झुगारता धडक कारवाई करत असल्याने भूमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

वसई विरार महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे हे डॅशिंग अधिकारी म्हणून ओळखले जातात. मीरा-भाईंदर महापालिकेत असतांनाही त्यांचा दरारा होता. मीरा-भाईंदर महापालिकेत अतिक्रमण विभागाचे प्रमुख असताना त्यांनी रस्त्यातील

फेरीवाल्यांपासून मोठ-मोठ्या बिल्डरांची अनधिकृत बांधकामे, डान्स बार जमीनदोस्त केले होते. वसई विरार महापालिकेत आल्यानंतर त्यांनी आपली ही धडक कारवाई सुरूच ठेवली होती. परंतु त्यांच्याकडील अनधिकृत बांधकाम विभाग काढून घेण्यात आल्याने शहरातील अतिक्रमण विरोधी मोहीम थंडावली होती. अजित मुठे यांच्यासारखा धडाकेबाज अधिकाऱ्याला साईडला केल्याने वसई-विरारकरांनी नाराजी व्यक्त केली होती. मात्र लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वसईतील ७ उपायुक्तांच्या अन्यत्र बदल्या करण्यात आल्या आणि पालिकेत मोठे फेरबदल झाले. मुठे यांच्याकडे पुन्हा अनधिकृत बांधकाम विभागाची जबाबदारी देण्यात आली.

वसई पूर्वेच्या वाघरळ पाडा येथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत असतात. मागील वर्षी दरड कोसळून दुर्घटना घडली होती. परंतु भूमाफियांनी तेथे पुन्हा अतिक्रमण करत बांधकामे सुरू केले. त्यामुळे मुठे यांनी याच ठिकाणी पहिल्यांदा कारवाईला सुरुवात केली. आयुक्त अनिलकुमार पवार आणि अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांच्या आदेशानुसार प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत, राजावली डांबर प्लॉट आणि वाघराळपाडा येथे १६ गाळे, १७ रूम व ८० पायाचे (प्लिंथचे) अंदाजे २८२५० चौ.फुट अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले. या कारवाईवेळी प्रभाग समिती 'जी' च्या सहाय्यक आयुक्त मनाली शिंदे आणि लिपिक विजय नडगे, लिपिक सुनील तेलगोटे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

बॉक्स.... पदभार स्वीकारताच मुठे यांनी शहरातील सर्व अनधिकृत बांधकामाची माहिती गोळा केली आणि थेट कारवाईला सुरुवात केली. एकदा कारवाईला निघाल्यावर रिकाम्या हाती परतायचे नाही. कुणालाही जुमानायचे नाही ही त्यांची कार्यपद्धत. त्यामुळे मुठे यांच्या पथकाने धडाकेबाज कारवाई करत भूमाफियांची अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यास सुरुवात केली. त्यामुळे 'सिंघम इज बॅक' असे वसई-विरारकर म्हणू लागले आहेत.

पुण्यनगरी पृ.पा.४.

# ऑनलाइन फसवणुकीची रक्कम मिळाली परत

## मीरा रोड पूर्वेतील प्रकार



। मीरा रोड : काशिगांव पोलीस ठाणे हद्दीतील तरुणाची वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन यूट्युब व्हिडिओ लाईक स्टास्क, ऑनलाइन हॉटेल, मूव्ही रेटिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून फसवणूक केली होती. फसवणूक केलेली संपूर्ण रक्कम ३ लाख ४५ हजार रुपये तक्रारदाराला काशिगांव पोलिसांनी परत मिळवून दिली आहे.

काशिगांव पोलीस ठाणे परिसरात राहणारे रिशु जयस्वाल (३०, रा. मीरा रोड पूर्व) वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन यूट्युब व्हिडिओ लाईक स्टास्क, ऑनलाइन हॉटेल, मूव्ही रेटिंग यांना लाईक अथवा गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ३ लाख ४५ हजार रुपयांची फसवणूक केली होती. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत तात्काळ गुन्हा दाखल करून तक्रारदाराच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती गोळा करण्यात आली. त्यानुसार तक्रारदाराची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने तक्रारदाराची रक्कम गोठवण्याबाबत संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. नंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाण्याचे अधिकारी, अंमलदारांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने साक्षीदाराची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम ३ लाख ४५ हजार रुपये त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली.

पुढारी पु.पा.४.

# वसई शहर प्रदूषणाच्या विळख्यात

## मधुबनमधील ८ आरएमसी प्लांटमुळे प्रदूषण, वसईकर त्रस्त

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

वसई पुर्वेच्या मधुबन परिसरात ८ आरएमसी प्लांट तयार झाले असून त्यामुळे मोठे प्रदूषण होऊ लागले आहे. यामुळे नागरिकांना आता श्वसनाच्या तक्रारीही वाढू लागल्या आहेत. दुसरीकडे महामार्गावरील प्रदूषण करणाऱ्या आरएमसी प्लांटवर अद्याप वसई विरार महापालिकेने कारवाई केलेली नाही. त्यामुळे वसई विरारचे नागरीक आरएमसी प्लांटमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहेत.

वसई पूर्वेच्या मधुबन परिसर असून तेथे मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती होऊ लागली आहे. हा परिसर शांत आणि मोकळ्या हवेचा परिसर म्हणून ओळखला जात होता. सकाळी आणि संध्याकाळी स्थानिक तेथे चालण्यासाठी येत असतात. मात्र आता या मधुबन परिसराला प्रदुषणाचा विळखा बसू लागला आहे. या परिसरात तब्बल ८ आरएससी प्लांट (रेडी मिक्स कॉंक्रीट) उभे राहिले आहेत. या आरएमसी प्लांटमुळे संपूर्ण मधुबन परिसर धुळीने व्यापला आहे.

या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात कचरा निघतो, त्याचे व्यवस्थापन होत नाही ज्यामुळे कचरा नाल्यांमध्ये टाकला जातो आणि नाले प्रदूपित होत आहेत. यामुळे नागरिक त्रस्त आहेत. वारंवार तक्रारी करूनही या प्रदुषणकारी प्लांटवर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. ज्यामुळे शहरात जल आणि वायू प्रदूषण वाढले आहे. तसेच नागरिकांना श्वसनाचे विकार होण्याचा धोका वाढला आहे. आरएमसी प्लांट उभारण्यासाठी अनेक परवानग्यांची आवश्यकता असते. त्यानुसार प्लांटधारकाने संबंधित महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जल (प्रतिबंधक व नियंत्रण) कायदा १९७४ नुसार परवानगी घेतली आहे का? याची तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. आरएमसी प्रकल्पामधून दिवस रात्र वातावरणात धूर सोडला जात आहे. महामार्गावरील आरएमसी प्लांटच्या कारवाईकडे पालिकेचे दुर्लक्ष

वसई पूर्व भागातील मालजीपाडा परिसरात तब्बल सहा आरएमसी प्लांट आहेत. या प्लांटमुळे मोठ्या प्रमाणात हरित वसईच्या निसर्गाची हानी होत आहे. सर्व परिसर धूळमय झाला आहे, परिसरातील बागांमध्ये धुळीचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांनी वेळोवेळी याबाबत तक्रार केल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने या प्लांटची तपासणी करून प्लांट बद करण्याचे निर्देश वसई विरार शहर महानगरपालिकेला दिले आहेत.



### आरएमसी प्लांटमुळे काय होते?

आरएमसी अर्थात रेडि मिक्स कॉंक्रीट यात कॉंक्रीट, डांबर, सिमेंट आदींचे मिक्सिंग किंवा अंतिम माल बनवण्याची प्रक्रिया केली जाते. या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात धुलिकण तयार होऊन ते सर्व परिसरात पसरतात यामुळे परिसरातील झाडे, प्राणी आणि रहिवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास होतो. यामुळे श्वसनाचे विकार होण्याची दाट शक्यता असते. या प्लांटमधून मोठ्या प्रमाणात कचरा निघतो, ज्याचे व्यवस्थापन होत नाही. नाल्यात किंवा रस्त्यावर हा कचरा पडून राहातो. ज्यामुळे नाल्याचे प्रदूषण होते. या कचऱ्यातून आणि प्लांटमधून हरित वायूचे उत्सर्जन होते ज्यामुळे वसई विरार शहर प्रदूपणाच्या विळख्यात अडकत आहे. सध्या, बांधकामांसाठी सिमेंट कॉंक्रीटची गरज आहे मात्र या प्लांटचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे जेणेकरून कमीत कमी प्रदूपण होईल.

> “मधुबनमधील आरएमसी प्लांटची तपासणी करून, पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या केल्या जातील. प्लांटमधून खडी, सिमेंट, वाळू आदींचे धुलिकण बाहेर पडत असतील तर त्यासाठी पाणी शिंपडणे किंवा टरपोलिन अथवा प्लास्टिक अंथरणे असे काही उपाय करण्यास प्लांट व्यवस्थापकांना सूचना दिल्या जातील. तसेच इतर सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असेल ते करण्याच्या सूचनादेखील दिल्या जातील.
>
> **- अनिलकुमार पवार,**
> आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका

> ज्या ज्या ठिकाणी असे अनधिकृत,आरएमसी प्लांट उभे केले आहेत त्यांची पाहणी करून त्यांच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल
>
> **- आनंद काटोले,**
> उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण ठाणे पालघर

पुढारी पु-पा-१.

# महामार्गावरील अपघात ११ टक्क्यांनी घटले

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वसई-विरार पट्ट्यातील अपघातांचे प्रमाण घटले आहे. २०२२ आणि २०२३ या दोन वर्षांच्या तुलनते अपघातांचे प्रमाण आणि अपघातात मृत्यू पावण्याचे प्रमाण साधारण १० ते ११ टक्क्यांनी घटले आहे. मागील २ वर्षात मुंबई-अहमदाबाद महामार्गावर १७३ जणांचा मृत्यू, तर २९५ जण जखमी झाले आहेत. अपघातात मृत्यू पावण्याचे प्रमाण घटले आहे. ही दिलासादायक बाब असली तरी महामार्गावरील अपघातांचा धोका मात्र कायम आहे.

राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ अधिक प्रमाणात वाढली आहे. त्यासोबत अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे.

विशेपतः महामार्गावर अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. काही भागात रस्त्याची झालेली लेन कटिंग, अपुऱ्या दुभाजक, पथदिव्यांचा अभाव अशा विविध कारणांमुळे अपघात घडत असतात.

लोकमत पु-पा-३.

# विरार पोलिसांची लॉकअप इमारत धोकादायक स्थितीत

## दुरुस्तीसाठी सरकारकडे दिला प्रस्ताव : पोलिसांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** राज्यातील पोलिस ठाण्यांना अत्याधुनिक सुविधा देऊन हायटेक करत पोलिस कर्मचाऱ्यांना सुविधा पुरवल्या जात असताना मुंबईजवळ असलेल्या विरार पोलिस ठाण्याची लॉकअप इमारत मात्र सध्या धोकादायक अवस्थेत आहे. ही ७० वर्षांपेक्षा जुनी लॉकअप इमारत आहे. या इमारतीच्या दुरुस्तीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवल्याचे पोलिस विभागाचे म्हणणे आहे.

मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत विरार पोलिस ठाणे हे अत्यंत वर्दळीचे पोलिस ठाणे आहे. मोबाइल हरवला, नातेवाईक हरवला, हाणामारी झाली, अपघात झाला आदी तक्रारी घेऊन नागरिक नेहमीच येथे येतात. लोकसंख्येनुसार येथे गुन्हेगारीचे प्रमाणही जास्त आहे.



▪ येथील पोलिस ठाण्याची लॉकअप इमारत सुमारे ७० वर्षे जुनी असून, अतिशय जीर्ण झाली आहे. खोलीमध्ये काही ठिकाणी छप्पर तुटलेले असून, भिंतीना तडे गेले आहेत. जुनाट इमारतीमुळे पोलिस कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पाऊस पडला की छतावरून पाणी टपकायला लागते. त्यामुळे विरार पोलिसांनी छतावर ताडपत्री टाकली आहे.

▪ मिळालेल्या माहितीनुसार, या इमारतीची आजतागायत कधीही डागडुजी झालेली नाही. पोलिसांनी अनेकदा दुरुस्तीचे प्रस्ताव पाठवूनही ते काम झाले नाही. पोलिस आपला जीव धोक्यात घालून कर्तव्य बजावत आहेत. वसई-विरारमध्ये पोलिस ठाणे, पोलिस क्वार्टर्स, गार्डन, हॉस्पिटल, मार्केट, पार्किंगसाठी अनेक आरक्षित जमिनी होत्या. मात्र, अधिकाऱ्यांनी सर्वच गोष्टींकडे दुर्लक्ष केले आहे.

## दागिने चोरून विक्री; मुलासह मैत्रिणीवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुलाने घरातल्या दागिन्यांची चोरी करून मैत्रिणीच्या मदतीने ते विकल्याप्रकरणी वडिलांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी मुलासह त्याच्या मैत्रिणीवर गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पूर्वेच्या गोल्डन वेस्ट येथील सोनम हाईट्समध्ये व्यवसायाने वकील असलेले भास्करदत्त देवीप्रसाद उपाध्याय राहतात. त्यांचा मुलगा प्रांजल हा केबिन क्रॉस रोड येथील पूजा नगरमध्ये राहतो. प्रांजल याने नकळत घरातील सोन्याच्या बांगड्या, सोनसाखळी, अंगठ्या, कानातले झुमके - रिंग आदी १ लाख १६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने परस्पर घरातून चोरी केले. नंतर ते त्याने मैत्रीण पूजा तिवारी हिच्या मदतीने विकले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर उपाध्याय यांच्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी २१ एप्रिल रोजी मुलगा प्रांजल व मुलाची मैत्रीण पूजा या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

## भाच्याने घातला मावशीला गंडा

**नालासोपारा :** नागिनदास पाडा येथील आनंद भवन चाळीत राहणाऱ्या सावित्रा पाटकर (३५) यांच्या पैशांचा अपहार झाला आहे. त्यांच्या बहिणीचा मुलगा रोहित याने स्वतःच्या फायद्यासाठी त्यांच्या नकळत एटीएमच्या पासवर्डचा वापर करून स्वतःच्या मोबाइलमध्ये फोन पे ॲप सुरू केले. त्यांच्या खात्यावरील २ लाख २० हजार रुपये रोहितने स्वतःच्या खात्यात पाठवून ते काढून अपहार केला. तुळींज पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला आहे.

## मारहाणप्रकरणी तिघांवर गुन्हा

**मीरा रोड :** मीरागाव टपाल कार्यालयाजवळ हलन गल्लीत अनिल सिंग हे राहतात. रात्री उशिरा सिंग यांना त्यांच्या घरासमोरच्या रस्त्यावर किशोर पांढरे (२६), गिरीश कुंभार (२२) आणि एका अनोळखी व्यक्तीने मिळून लाकडी बांबूने मारहाण केली. त्यात सिंग यांचे डोके बांबू मारून फोडले. तर सिंग यांना वाचवण्यासाठी आलेल्या पत्नी पद्मा यांच्या खांद्यावर बांबूने मारून त्यांना दुखापत केली. पद्मा यांनी दिलेल्या या फिर्यादीवरून काशीमीरा पोलिस ठाण्यात पांढरे, कुंभार व अनोळखी व्यक्तीविरोधात २४ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद आवळे हे तपास करत आहेत.

लोकमत

पु. पा.१. ⟷ पु-पा-१.

## चहा विक्रेत्याची फसवणूक

**नालासोपारा :** अलकापुरीच्या लक्ष्मी निवास येथे राहणाऱ्या अशोक यादव (३२) या चहा विक्रेत्याची ५ ऑगस्ट २०१३ ते आजपर्यंत रूमच्या नावावर लाखोंची फसवणूक झाली आहे. आरोपी आनंद चौबे याने त्यांना रूम विकत देतो, असे सांगून वेळोवेळी १० लाख रुपये चेकने आणि अडीच लाख रुपये रोखीने घेतले. मात्र, त्याने अशोक यांना आजपर्यंत रूम दिला नाही व घेतलेले पैसेही परत न करता फसवणूक केली आहे. आचोळे पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला आहे.

## वीजचोरावर गुन्हा दाखल

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा गावातील हंसराज अनंत पाटील याच्यावर भाईंदर पोलिस ठाण्यात २२ एप्रिलला वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हंसराज याने अदानी वीज कंपनीची वीज बेकायदा चोरी केली म्हणून कंपनीच्या वतीने पोलिसांना फिर्याद देण्यात आली होती.

CamScanner

लोकमत पु.पा.२.

लोकमत पु-पा-३.

# परदेशी भाडेकरूंची माहिती लपवणाऱ्यांना बेड्या


## तुळींजमध्ये २५ घरमालकांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** परदेशी नागरिकांना रूम भाड्याने दिल्याची माहिती पोलिस ठाण्यात न देता ती लपवून ठेवणे २५ घरमालकांना चांगलेच महागात पडले आहे. त्यांना तुळींज पोलिसांनी अटक करून त्यांच्यावर कारवाई केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी गुरुवारी दिली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात तुळींज पोलिस ठाण्याच्या हद्दीत प्रगतीनगर व मोरेगाव भागात मोठ्या प्रमाणात परकीय नागरिक हे घरे भाडेतत्त्वावर घेऊन वास्तव्य करतात. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये परदेशी नागरिकांना कोणत्याही घरात, हॉटेल व व्यावसायिक तत्त्वावर राहण्यास देणे, याबाबतची माहिती घरमालक, हॉटेल चालक यांनी २४ तासांच्या आत 'सी फॉर्म' भरून स्थानिक पोलिसांना देणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्याची तरतूद आहे.

त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी मनाई आदेश सीआरपीसी १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये पारीत केले होते. त्यावरून पोलिस उपायुक्त (मुख्यालय) यांनी भाडेकरू मनाई आदेश पारीत केल्यानंतर त्याबाबत पोलिसांनी वर्तमानपत्रे, भिंतीवर पत्रके लावून समाजात जागृती केली होती. तरीही काही घरमालकांनी त्यांच्याकडे परकीय नागरिक हे भाडेतत्त्वावर राहण्यास आले, याची माहिती पोलिस ठाण्यात दिली नाही.




### ...अन्यथा त्यांना घर भाड्याने देऊ नका

सर्व नागरिकांनी भाडेकरू ठेवताना त्यांची सर्व माहिती पोलिस ठाण्यास द्यावी. तसेच, परकीय नागरिकांना घर भाडेतत्त्वावर देताना त्यांचा सी फॉर्म भरून घेणे बंधनकारक आहे. तरी परदेशी नागरिकांचा पासपोर्ट, व्हिजा वैध नसल्यास त्यांना घरे भाड्याने देऊ नयेत, असे पोलिसांकडून आवाहन करण्यात आले आहे.

### यांनी केली कामगिरी

पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त उमेश माने-पाटील, तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दत्तात्रय पाटील, सपोनि सुनील पवार, पोलिस शिपाई अक्षय झांजुणे, राहुल साळुंखे या तुळींज पोलिस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरीत्या ही कामगिरी पार पाडली आहे.

**■ अशा २५ घरमालकांविरोधात तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करून घरमालकांना अटक करून वसई न्यायालयासमोर हजर केले आहे. घरमालकांविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याने सदर घरमालक आरोपी हे कारावासाची शिक्षा व दंडास पात्र राहणार आहेत.**

# मीरा रोडमधून रिक्षा चोरीला

**मीरा रोड :** काशीगाव, माशाचा पाडा रस्ता येथील अजयनगरमध्ये राहणारे सभाशंकर सतीराम या रिक्षाचालकाने त्याची रिक्षा रस्त्यावर अजयनगर येथे उभी केली होती. ती रिक्षा चोरट्याने चोरून नेली. त्यांच्या फिर्यादीवरून काशीगाव पोलिस ठाण्यात २४ एप्रिल रोजी ३५ हजार रुपयांच्या रिक्षा चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस तपास करत आहेत.

# मुर्धा गावात घरफोडी; २ लाखांचा ऐवज लंपास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुर्धा गावात राहणाऱ्या महिला कामानिमित्त बाहेर गेल्या असता त्यांच्या घरात दोन लाखांची घरफोडी झाल्याची घटना घडली.

भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा गावात सावित्रीबाई फुले उद्यानासमोर इंदुमती जगन्नाथ पाटील या ६४ वर्षीय महिला राहतात. २४ एप्रिल रोजी सकाळी ११. ३० च्या सुमारास त्या मुलीसोबत बाहेर गेल्या होत्या. पाऊणच्या सुमारास त्या घरी परतल्या असता त्यांच्या घराचा कडीकोयंडा तोडून कपाटात ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र, कानातले असा १ लाख ९० हजार किमतीचा ऐवज चोरीला गेला होता. घटनेची माहिती मिळताच त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली.

याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलिस उपनिरीक्षक प्रसाद गोवले तपास करत आहेत.

# पोटाला पिस्तूल; व्यावसायिकाचे केले अपहरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई न्यू लिंक रोडवरील रश्मी क्लासिक बिल्डिंगमध्ये राहणारे व्यापारी अजित मिश्रा (३९) यांच्या पोटाला पिस्तूल लावून त्यांचे अपहरण केल्याची घटना उघडकीस आली आहे.

घटनेच्या दिवशी अजित त्यांच्या जुचंद्र येथील ऑफिसमध्ये बसलेले असताना आसिफ शेख, शहबाझ फारुखी, अझर शेख व एक आरोपी हे येऊन त्यांनी ऑफिसमधील सीसीटीव्ही व डीव्हीआरची केबल काढली. आसिफ याने पोटाजवळ पिस्तूल लावली व जबरदस्तीने कारमध्ये बसवून सिकंदर शेख यांचे नालासोपारा येथील बाबा टॉवरमध्ये नेले. तिथे सिकंदर याने शिवीगाळ करून धमकी दिली. तसेच आसिफ व त्यांच्या साथीदारांनी त्यांना धमकी देऊन एका रद्द करारावर जबरदस्तीने सही करुन घेतली. दुसऱ्या कॅबिनमध्ये त्यांना नेऊन नोटरीवर जबरदस्तीने सही रात्री साडेदहापर्यंत त्यांना डांबून ठेवले. अजित मिश्रा यांनी बुधवारी रात्री आसिफ, सिकंदर, शहबाझ फारुखी, आरिफ शेख, प्रवीण सिंग, अझर शेख व अन्य दोघांविरुद्ध नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# विरारमध्ये घरात चोरी




लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरारच्या जगन्नाथनगर येथील राजहंस अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या इंद्रजित दास (३०) यांच्या घरी १९ एप्रिलला रात्री चोरी झाली आहे. घटनेच्या दिवशी घराच्या उघड्या दरवाजातून चोरट्याने प्रवेश करून ३० हजारांची सोन्याची चेन, ४४ हजारांच्या तीन सोन्याच्या अंगठ्या असे एकूण ७४ हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहे. विरार पोलिसांनी बुधवारी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत

# परदेशी भाडेकरूंची माहिती लपवणाऱ्यांना बेड्या

## तुळींजमध्ये २५ घरमालकांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** परदेशी नागरिकांना रूम भाड्याने दिल्याची माहिती पोलिस ठाण्यात न देता ती लपवून ठेवणे २५ घरमालकांना चांगलेच महागात पडले आहे. त्यांना तुळींज पोलिसांनी अटक करून त्यांच्यावर कारवाई केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी गुरुवारी दिली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात तुळींज पोलिस ठाण्याच्या हद्दीत प्रगतीनगर व मोरेगाव भागात मोठ्या प्रमाणात परकीय नागरिक हे घरे भाडेतत्त्वावर घेऊन वास्तव्य करतात. विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये परदेशी नागरिकांना कोणत्याही घरात, हॉटेल व व्यावसायिक तत्त्वावर राहण्यास देणे, याबाबतची माहिती घरमालक, हॉटेल चालक यांनी २४ तासांच्या आत 'सी फॉर्म' भरून स्थानिक पोलिसांना देणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्याची तरतूद आहे.

त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी मनाई आदेश सीआरपीसी १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये पारीत केले होते. त्यावरून पोलिस उपायुक्त (मुख्यालय) यांनी भाडेकरू मनाई आदेश पारीत केल्यानंतर त्याबाबत पोलिसांनी वर्तमानपत्रे, भिंतीवर पत्रके लावून समाजात जागृती केली होती. तरीही काही घरमालकांनी त्यांच्याकडे परकीय नागरिक हे भाडेतत्त्वावर राहण्यास आले, याची माहिती पोलिस ठाण्यात दिली नाही.




### ...अन्यथा त्यांना घर भाड्याने देऊ नका

सर्व नागरिकांनी भाडेकरू ठेवताना त्यांची सर्व माहिती पोलिस ठाण्यास द्यावी. तसेच, परकीय नागरिकांना घर भाडेतत्वावर देताना त्यांचा सी फॉर्म भरून घेणे बंधनकारक आहे. तरी परदेशी नागरिकांचा पासपोर्ट, व्हिजा वैध नसल्यास त्यांना घरे भाड्याने देऊ नयेत, असे पोलिसांकडून आवाहन करण्यात आले आहे.

### यांनी केली कामगिरी

पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त उमेश माने-पाटील, तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दत्तात्रय पाटील, सपोनि सुनील पवार, पोलिस शिपाई अक्षय झांजुणे, राहुल साळुंखे या तुळींज पोलिस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरीत्या ही कामगिरी पार पाडली आहे.

- अशा २५ घरमालकांविरोधात तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करून घरमालकांना अटक करून वसई न्यायालयासमोर हजर केले आहे. घरमालकांविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याने सदर घरमालक आरोपी हे कारावासाची शिक्षा व दंडास पात्र राहणार आहेत.



CamScanner

# 25 landlords arrested for not giving tenant info

SURESH GOLANI / MIRA-BHAYANDAR

The Tulinj police arrested 25 landlords in Nallasopara for their failure to provide information about their tenants while leasing out their property including flats, houses, and commercial establishments to them.

Notably, most of the tenants turned out to be Nigerian nationals. The accused landlords were arrested and booked under section 188 (disobedience to order duly promulgated by public servant) of the Indian Penal Code and provisions of the Foreigners Act.

> **Tenants are mostly Nigerians; besides fines, convictions in such cases can attract jail terms**

Besides paying fines, convictions in such cases can also attract jail terms. Alarmed by the rising presence of foreign nationals illegally staying in the region, the MBVV police have been regularly issuing directives and creating awareness to remind property owners and estate agents about their duty of intimation before carrying out rental transactions.

The police recently issued an order to this effect under section 144 (1) (2) of the Criminal Procedure Code (CrPC)-1973.

"The landlords are mandated to submit the details of their tenants to the police station before leasing out their properties. In case of foreign nationals, it is binding upon the landlords to fill the prescribed form supported by valid documents including valid visas, passports and the reason for residing in the city, failing which they would be liable for legal action," warned police commissioner Madhukar Pandey.

Apart from landlords, it is binding upon establishments, including hotels, lodges, clubs and guest houses to submit details of their foreign tenants/guests in the prescribed format to the local police station within 24 hours.

The mandate is also applicable for establishments and private companies that employ foreign nationals. It has come to light that some miscreants change their rental accommodations without intimation and manage to overstay in the country.

CS CamScanner

# कोई भी अनजान व्यक्ति के बहकावे में आकर अपने बैंक से सम्बंधित जानकारी देन से बचें : वरिष्ठ पुलिस निरीक्षक

**भायंदर:**अपने स्मार्ट मोबाइल फोन से मूवी सिनेमा और यूट्यूब पर अपलोड विडिओ को लाइक करके घर बैठे निवेश करके ज्यादा रूपये कमाने का लालच देकर अज्ञात व्यक्ति ने जायसवाल से ऑनलाइन साढ़े तीन लाख रूपये ठग लिए।

प्राप्त जानकारी के अनुसार काशीगाँव निवासी जायसवाल द्वारा इस प्रकार की शिकायत पर पुलिस ने अज्ञात व्यक्ति के खिलाफ मामला दर्ज कर मामले की जाँच पड़ताल करनी शुरू की।

जहा प्रारम्भिक जाँच में काशी गाँव पुलिस स्टेशन के अधिकारीयों ने जायसवाल की उस अज्ञात के साथ लेनदेन से सम्बंधित जानकारी बैंक से मंगाई तत्पश्चात प्राप्त ब्यौरे का अवलोकन करने के दौरान पुलिस को यह पता चला की शिकायतकर्ता का रुपया अलग-अलग बैंक खातों में भेजा गया है, तो फौरन ही आरोपी के बैंक खाते को संबंधित बैंक से पत्राचार कर पुलिस ने फ्रिज कर दिया उपरांत अदालत के आदेश के बाद फ्रिज किये गए बैंक खाते में से 3 लाख 45 हजार रुपये जायसवाल को पुनः प्राप्त हुए।

वरिष्ठ पुलिस निरीक्षक राहुल पाटिल ने नागरिकों से अपील करते हुए कहा की कोई भी अनजान व्यक्ति के बहकावे में आकर या वर्क फ्रॉम होम जैसे प्रलोभन के चक्कर में ना फंसे और अपने बैंक से सम्बंधित जानकारी तथा किसी भी प्रकार का व्यापारिक एवं व्यावहारिक लेन-देन करने से बचें।

CS CamScanner

# 25 मकान मालिकों के खिलाफ कार्रवाई

नालासोपारा। पालघर जिले में पुलिस ने विदेशी नागरिकों को बिना नियमों का पालन किए परिसर किराए पर देने पर 25 लोगों को गिरफ्तार किया है। एक अधिकारी ने बृहस्पतिवार को यह जानकारी दी। उन्होंने बताया कि संपत्ति मालिकों ने मुंबई के बाहरी इलाके नालासोपारा (पूर्व) में तुलिंज पुलिस थाना क्षेत्र में आवासीय और वाणिज्यिक उद्देश्यों के लिए विदेशियों को अपना परिसर दिया था। एक आधिकारिक विज्ञप्ति के अनुसार इस प्रकार के मामलों में मालिकों को अपने परिसर को किराए पर देने के 24 घंटे के भीतर पुलिस को सूचित करना होगा। मौजूदा कानूनों के अनुसार नियमों का पालन नहीं करने वालों पर कार्रवाई की जा सकती है। अधिकारी ने कहा कि नियमों के बारे में बार बार बताने और चेतावनी देने के बावजूद संपत्ति मालिकों ने नियमों का पालन नहीं किया।

महि
मे

ठाणे।
हमला
के खि
बृहस्पी
पर ह
है। प्रा
मामला
और 3
सोसाए
गई अ
उसकी
निशान
पर उर
आपूर्ति

CamScanner